# डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली

**(हा नमुना भरण्यापूर्वी सोबतच्या सुचना काळजीपूर्वक वाचाव्यात)**

## नामनिर्देशन पत्र

**भविष्य निर्वाह निधी लेखा क्र. डॉ.बासाकोंकृवि/**

**(कुटुंब असलेल्या वर्गणीदाराच्या वापरासाठी)**

१. मी ____________________________________________ याव्दारे, माझी भविष्य निर्वाह निधीमधील रक्कम मला देय होण्यापूर्वी अथवा ती देय झालेली असून, आलेली नसेल अशा वेळी माझा मृत्यु झाल्यास, निधीमध्ये माझ्या खात्यावर जमा झालेली असेल अशी रक्कम घेण्यास, मुंबई सर्व साधारण भविष्यनिर्वाह निधी नियम २ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे, माझ्या कुटुंबातील व्यक्ती असलेली/असलेल्या खाली निर्दिष्ट केलेली/केलेल्या व्यक्तीला/व्यक्तींना नामनिर्दिष्ट करीत आहे आणि असा निर्देश देत आहे, की, उक्त रक्कम उक्त व्यक्तीच्या/उक्त व्यक्तींच्या नावासमोर/नावांसमोर दिलेल्या पध्दतीने त्या व्यक्तीला/त्या व्यक्तीमध्ये देण्यात यावी/ वाटून देण्यात यावी.

---

**(कुटुंब नसलेल्या वर्गणीदाराच्या वापरासाठी)**

२. मी ____________________________________________ मुंबई सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी नियम २ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे, कुटुंब धारण करीत नसल्याकारणाने माझी भविष्यनिर्वाह निधीमधील रक्कम मला देय होण्यापूर्वी अथवा देय झलेली असून देण्यात आलेली नसेल अशा वेळी माझा मृत्यु झाल्यास निधीमध्ये माझ्या खात्यावर जमा झालेली असले अशी रक्कम घेण्यास खाली निर्दिष्ट केलेल्या व्यक्तीस/व्यक्तींना नामनिर्दिष्ट करीत आहे आणि असा निर्देश देत आहे की, उक्त रक्कम उक्त व्यक्तीच्या नावासमोर/उक्त व्यक्तींच्या नावांसमोर दिलेल्या पध्दतीने त्या व्यक्तीला देण्यात यावी/त्या व्यक्तींमध्ये वाटून देण्यात यावी.

यानंतर मी कुटुंब प्राप्त केल्यास हे नामनिर्देशन विधिअग्राहय ठरेल.

| नामनिर्देशित व्यक्तीचे/व्यक्तींचे नाव व पूर्ण पत्ता | वर्गणीदाराशी असलेले नाते | नामनिर्देशित व्यक्तीचे वय | (प्रत्येक नामनिर्देशित) व्यक्तीला देय असलेला भाग | आकस्मिक घटना घडल्यामुळे नामनिर्देशन विधिअग्राहय ठरेल अशा आकस्मिक घटना | नामनिर्देशित व्यक्ती मरण पावल्यास त्याचा/तिचा हक्क ज्या व्यक्तीकडे/व्यक्तींकडे जाणार असेल त्या व्यक्तीचे/व्यक्तींची नाव/नावे, पत्ता आणि नाते |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

दिनांक ठिकाण (वर्गणीदाराची स्वाक्षरी)

स्वाक्षरीचे दोन साक्षीदार :

नाव पत्ता स्वाक्षरी

१. ______________________________

२. ______________________________

---

श्री/ श्रीमती/ कुमारी ______________________________ यांनी केलेले

पदनाम

(कार्यालय प्रमुखाचे पदनाम व सही)
दिनांक :

नामनिर्देशनत्र मिळाल्याचा
दिनांक :

**नियंत्रक**
डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण
कृषि विद्यापीठ, दापोली



## नामनिर्देशन भरण्यापूर्वी खालील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात

**सूचना :-**

(१) मुंबई सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी नियमातील ‘कुटुंब’ या शब्दाची व्याख्या खाली पुनरुद्धृत केली आहे :-

**‘कुटुंब’ याचा अर्थ :-**

(एक) पुरुष वर्गणीदाराच्या बाबतीत वर्णणीदाराची बायको किंवा बायका आणि त्याची मुले, आणि वर्गणीदाराच्या मयत मुलाची विधवा बायको किंवा बायका आणि त्याची मुले :

परंतु, जर वर्गणीदाराने त्याची पत्नी त्यायिकरीत्या त्याच्यापासून विभक्त झाली आहे किंवा ती ज्या जातीची आहे त्या जातीच्या रुढीगत विधीनुसार तिने निर्वाहाचा हक्क गमावलेला असेल असे सिध्द करुन दाखविले तर, हे नियम ज्या बाबतीत लागू होतात त्या बाबतीत ती वर्गणीदाराच्या कुटुंबाची सदस्य मानली जाणार नाही. तथापि, जर वर्गणीदार नंतर स्पष्ट लेखी निवेदनाव्दारे अशी व्यक्ती कुटुंबातील सदस्य समजण्यात यावी, असे लेखा अधिकाऱ्यास कळवील तर ती व्यक्ती वर्गणीदाराच्या कुटुंबातील व्यक्ती म्हणून समजण्यात येईल.

(दोन) स्त्री वर्गणीदाराच्या बाबतीत वर्गणीदाराचा पती आणि तिची मुले आणि वर्गणीदाराच्या मृत मुलाची विधवा बायको किंवा बायका आणि मुले :

परंतु जर एखादा वर्गणीदाराने, लेखा अधिकाऱ्याला लेखी निवेदनाव्दारे पतीला कुटुंबातून वगळण्यात यावे अशी इच्छा व्यक्त केली असेल त्याबाबतीत, वर्गणीदाराने त्याला तिच्या कुटुंबातून वगळण्यासंबंधीचे लेखी निवेदन त्यानंतर रद्द केलेले नसेल तर, हे नियम ज्या बार्बीच्या संबंधात लागू असतील, त्या बाबीपुरते त्यास त्यापुढे कुटुंबाचा सदस्य समजण्यात येणार नाही. परंतु, जर वर्गणीदार नंतर अशा व्यक्तीस कुटुंबातून वगळण्याबाबत दिलेली सूचना लेखीरीत्य रीतसरपणे रद्द करीत तर अशा व्यक्तीस कुटुंबातील व्यक्ती म्हणून समजण्यास येईल.

टीप १ :- ‘मुले’ याचा अर्थ औरस संतती असा आहे.

टीप २ :- वर्गणीदारास लागू असलेल्या व्यक्तिगत कायद्यानुसार जर मूल दत्तक घेणे कायदेशीररीत्या मान्य करण्यात आले असेल व त्यामुळे मुलाला नैसर्गिक मुलाचा दर्जा प्राप्त होत आहे. याबाबत लेखा अधिकाऱ्याचे किंवा लेखा अधिकाऱ्याच्या मनात कोणताही संदेह निर्माण झाल्यास, मुंबई शासनाचे सॉलिसिटर यांचे समाधान होईल. तर दत्तक घेतलेले मूल नैसर्गिक मूल म्हणून समजण्यात येईल. परंतु ही गोष्ट केवळ याबाबतीतच मान्य करण्यात येईल.

(२) केवळ एकाच व्यक्तीला नामनिर्देशित करण्यात आले असेल तर, नामनिर्देशितीच्या नावासमोर स्तंभ ४ मध्ये पूर्ण रक्कम असे लिहीण्यात यावे. एकापेक्षा अधिक व्यक्तींना नामनिर्देशित केले असेल तर, भविष्यनिर्वाह निधीच्या संपूर्ण रकमेतील किती हिस्सा नामनिर्देशितीला देय आहे ते प्रत्येक नामनिर्देशितीच्या नावासमोर स्तंभ ४ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात यावे.

(३) नामनिर्देशितीचा (नामनिर्देशितींचा) मृत्यु ही घटना आकस्मीक घटना म्हणून स्तंभ ५ मध्ये नमूद करु नये.

(४) वर्गणीदाराने स्वत:चे नाव स्तंभ ६ मध्ये करु नये.

(५) वर्गणीदाराने नामनिर्देशनावर स्वाक्षरी केल्यानंतर त्यामध्ये आणखी कोणतीही नावे साविष्ट करता येऊ नयेत म्हणून शेवटच्या नोंदीनंतरच्या रिकाम्या जागेत तिरप्या रेषा काढाव्यात.